# राणीमाशी: स्त्रीपुरुष संबंधांवर भाष्य

**संजय कांबळे**

मराठी विभाग, राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगावी, कर्नाटक

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259547

**ABSTRACT:**

शरणकुमार लिंबाळे यांनी आपल्या वाङ्मयीन वाटचालीमध्ये तीन आत्मनिवेदनात्मक पुस्तके लिहिली.'अक्करमाशी' (१९८४), 'बारामाशी' (१९८८), 'राणीमाशी' (१९९२) यांचा उल्लेख होतो. दाहक जीवनानुभवातून 'अक्करमाशी' ची निर्मिती झाली आहे. तर 'बारामाशी' या आत्मकथनात लिंबाळे 'दलित ब्राह्मण' म्हणून पांढरपेशा मध्यमवर्गीय मनाची कबुली देतात, तर 'राणीमाशी' या तिसऱ्या आत्मनिवेदनात्मक पुस्तकात 'विवाह बाह्य स्त्रीपुरूष संबंधा'चे चित्रण आले आहे.

मराठी साहित्यामध्ये तीन वेगवेगळ्या विषयावरील आत्मकथने लिहिण्याची ही एक अपवादात्मक पध्दत आहे. मात्र शरणकुमार लिंबाळे यांनी अशा वेगवेगळ्या विषयावर 'आत्मकथने' लिहून मराठी आत्मकथनामध्ये मोलाची भर टाकली आहे.

**KEYWORDS:**

राणीमाशी, शरणकुमार लिंबाळे, विवाहबाह्य संबंध, आत्मकथन, दलित साहित्य.

## 'राणीमाशी' एक प्रयोगशील आत्मकथन:

शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांचा विचार करीत असताना असे दिसते की, लिंबाळे यांनी तीन प्रकारची तीन आत्मकथने लिहिली. या तिन्ही म्हणजे 'अक्करमाशी', 'बारामाशी', 'राणीमाशी' आत्मकथनामधून जे अनुभवविश्व साकारले आहे ते त्रिमिती (Three Dimention) स्वरूपाचे आहे. 'राणीमाशी' या आत्मकथनाच्या मलपृष्ठावर शरणकुमार लिंबाळे यांनी आपली भूमिका मांडली आहे. लिंबाळे म्हणतात. "सूर्योदय, सूर्यास्त आणि माध्यान्ह एकच सूर्य पण वेगवेगळी रूपं शरणही तसाच, अक्करमाशी, बारामाशी आणि राणीमाशीत कधी मेंदीच्या पानासारखा हिरवागर्द तर कधी, खुनी

माणसाच्या रक्तासारखा काळाभोर'३५ लिंबाळे यांचे जीवनातील रूप वेगवेगळया अवस्थामधून बदलत गेल्याचे जाणवते. 'अक्करमाशी' तील शरणचे रूप हे माध्यान्हाच्या भाजून काढणाऱ्या उन्हासारखे, 'बारामाशी'तील रूप हे सूर्यास्ताच्या रंगीबेरंगी उन्हाच्या कवडशांसारखे, तर 'राणीमाशी' तील रूप हे मध्यरात्रीच्या गडद काळोखासारखे असलेले दिसते. एकूणच 'अक्करमाशी' दाहक अनुभव घेतलेला नायक पुढे दलित ब्राह्मण होऊन समाजापासून तुटतो हे तुटलेपण 'बारामाशीत' येते, तर विवाहित असून देखील भावनिक, शारिरिक आकर्षणापायी स्वतःच्या कुटुंबापासून तुटतो. हे तुटलेपण 'राणीमाशीत' येते. या सर्व स्थित्यंतराचा विचार केल्यानंतर असे दिसते की शरणकुमार लिंबाळे यांची वाटचाल व्यापक सामाजिक जाणिवेकडून केवळ व्यक्तिगत जाणिवेकडे, सामाजिक वेदनेकडून खाजगी वेदनेकडे, उदात्ततेकडून मदमत्तेकडे चालल्याचे दिसते.

'राणीमाशी' आत्मकथनातील प्रयोगशीलतेचा विचार करताना असे दिसते की, 'राणीमाशी' मध्ये 'स्व' केंद्रित जीवनानुभव आणि 'वि' केंद्रित जीवनानुभव संमिश्र स्वरूपात अवतरले आहेत. तसेच 'राणीमाशी' या आत्मकथनात तिहेरी निवेदन पध्दत वापरलेली दिसते. शरणकेंद्री म्हणजेच 'स्व'केंद्रि निवेदन पध्दत, 'स्वाती'केंद्रि निवेदन पध्दत आणि 'कसम केंद्रि निवेदन पध्दत अशा या पध्दतीचा वापर करून वाङ्मयप्रकाराच्या पारंपरिक कल्पनांना बाजूला सारून एक वेगळा प्रयोग 'राणीमाशी' मध्ये दिसतो 'स्व' ला दुसऱ्यांच्या दृष्टिकोणातून बघितले जाण्याचा अभिनव प्रयोग 'राणीमाशी' मध्ये येतो.

'राणीमाशी' या कलाकृतीला दलित साहित्यकृती म्हणावे की म्हणू नये असा प्रश्न शरणकुमार लिबाळे वाचकासमोर उपस्थित करतात कारण 'राणीमाशी' हे आत्मकथन 'दलित साहित्य' या संजेला छेदणारी कलाकृती ठरते. शरणकुमार लिंबाळे यांना 'दलित साहित्य' प्रवाहातील महत्त्वाचे साहित्यिक म्हणून ओळखले जाते. मात्र 'राणीमाशी'च्या संदर्भात विचार केल्यानंतर 'राणीमाशी'तील जीवन हे 'दलित' नसून काही अंशी दलित जीवन 'राणीमाशी' मध्ये येते. बाकीचे सारे अनुभवविश्व दलितेतर येते. विशेष म्हणजे त्यातही सामाजिकतेच्या व्यापक परिणामाचे साहित्यत्व आढळत नाही म्हणून प्रा. विजय खंदारे याबाबत म्हणतात, "अक्करमाशी' शंभर टक्के दलित जीवन आढळून येते.

तर 'बारामाशीत' ते पंचवीस ते तीस टक्के प्रमाणात येते. परंतु 'राणीमाशीत' मात्र दलित जीवन क्वचित प्रमाणात आढळते. कारण लिंबाळेनी इथे प्रेमाला अधिक महत्त्व दिलेले आहे प्रेम हीच भावना केंद्रवर्ती मानून लेखन केल्यामुळे ही दलित कलाकृती मानावी की नाही असा प्रश्न पडतो." त्यामुळे दलित साहित्यातून दलित जीवनाचे प्रतिबिंब झालेच पाहिजे, हया भूमिकेला शरणकुमार लिंबाळे यांची 'राणीमाशी' कलाकृती छेद देते. म्हणून ही या आत्मकथनाची दुसरी प्रयोगशीलता ठरते. 'राणीमाशी' चे लेखन हे बिनधास्त ठरते. शिष्टसंमत संकेतनाही कलाकृती धुडकावते. आणि आपले वेगळे अस्तित्त्व आत्मकथनाच्या प्रवाहात सिध्द करण्याचा प्रयत्न करते म्हणून 'राणीमाशी' विषयी प्रा. दत्ता भगत म्हणतात, "हया बिनधास्त अभिव्यक्तीचे काही आनुषंगिक परिणाम होत असतात. उदाहरणार्थ, काही शब्द प्रयोग सार्वत्रिकपणे वापरू नयेत असे आपला शिष्टाचार मानतो. पण हा शिष्टाचार वरील प्रकारच्या बिनधास्त अभिव्यक्तीत बसत नाही. काही शिष्टसंमत संकेत असतात ज्यांचा उच्चार जाहीरपणे करू नये असे आपण मानतो. पण अस संकेतही इथे धुडकावले जातात. परिणामी लिंबाळे यांचे लेखन काही वेळेला आपल्या रूढ अभिरुचीलाही ओरबाडून काढते. अशा वेळी त्यांच्या लेखनाची संभावना विकृत लेखन, अभिरुचीरहीन लेखन अशीही होऊ शकते. त्यांच्या 'राणीमाशी' वरील काही प्रतिक्रिया याच स्वरूपाच्या ऐकल्या आहेत. अशा प्रकारची रूढ संकेताना धुडकावणारी रचना करून शरणकुमार लिंबाळे यांनी ही दुसरी प्रयोगशील भूमिका घेतल्याचे दिसून येते.

आत्मकथन काल्पनिक असू शकते. अशा प्रकारचा दृष्टिकोन शरणकुमार लिंबाळे यांनी 'राणीमाशी' संदर्भात घेतला आहे. ही त्यांची तिसरी प्रयोगशीलता होय. 'राणीमाशी' या१९७

आत्मकथनातील 'मनातलं' या मनोगतात लिंबाळे म्हणतात, "हे माझे भावविश्व आहे...... म्हटलं तर आत्मलेखन." तर 'मनातलं' च्या पूर्वपृष्ठावर, "'राणीमाशी' ही काल्पनिक कलाकृती आहे 'ती' केवळ असत्य आहे. ती कधीच 'सत्य' नव्हती" असे लिहून वाचकांच्या समोर लिंबाळे संभ्रमावस्था निर्माण करतात. म्हणून डॉ. श्रीपाल सबनीस 'राणीमाशी' संदर्भात म्हणतात, "शरणची ही आत्मकहाणी कादंबरीचा मुखवटा घेऊन आल्यामुळे समीक्षकांनी स्वतःची अडचण मानून घेतली. उलट आपला

हेतू दोन अंगानी सफल झाल्याचे समाधान लिंबाळे यांना मिळाले आहे 'आत्मकथा' म्हंटल्यामुळे स्वकधनतील जिवंत व्यक्ती, अब्रुनुकसानीचे (अन्नु नसतानाही) दावे दाखल करण्याची भीती लेखकाला असावी, म्हणून आत्मकथेचा गाभा असला तरी कादंबरीच्या आकृतीबंधात हे लेखन केल्याने, कोर्टकचेऱ्या टळल्या आहेत. शिवाय कादंबरी की आत्मकथा' असा बुचकळयात समीक्षकांना अडकवून व फॉर्मच्या नव्या संदर्भात वादग्रस्त ठरून, लक्ष वेधण्याचा प्रयत्न या लेखनात झालेला आहे. "" एकूणच 'राणीमाशी' हे आत्मकथन म्हणावे की काल्पनिक कलाकृती म्हणावी, याचा अन्वयार्थ वाचकांनी लावावा ही भूमिका शरणकुमार लिंबाळे यांनी घेतलेली दिसते.

वरील सर्व वैशिष्ट्यांचा विचार 'राणीमाशी'च्या संदर्भात विचार केल्यानंतर 'राणीमाशी' हे एक प्रयोगशील आत्मकथन ठरते.

**'राणीमाशी' आत्मकथनाचे स्वरूप:**

शरणकुमार लिंबाळे यांच्या आयुष्यात विवाहोत्तर काळात 'स्वाती' नावाची जी सवर्ण, मध्यमवर्गीय, विवाहित स्त्री प्रेयसी म्हणून आली. तिला उद्देशून, तिच्या वृत्तीचा निर्देश करण्यासाठी 'राणीमाशी' या शीर्षकाचे आत्मकथन लिंबाळे यांनी लिहिले. 'स्वाती'ची प्रवृत्ती मधमाशातील पोळयातील राणीमाशीसारखी आढळली. मधमाशांच्या पोळयातील राणीमाशीच्या बरोबर नराचा संयोग झाला की तो मरतो. तशीच अवस्था 'राणीमाशी'तील नायकाची होते. म्हणून शरणकुमार लिंबाळे आपल्या 'राणीमाशी' या आत्मकथनातील निवेदनात म्हणतात, "वापरणं व मारणं ही तर 'राणीमाशी'ची प्रवृत्ती, जी माणसातही असते." राणीमाशीची प्रवृत्ती लिंबाळे यांना 'स्वाती' सारख्या सुंदर स्त्रीमध्ये आढळते. तसे पाहायला गेले तर सुंदर स्त्री ही शेवाळच असते. तिच्या संपर्कामध्ये गेल्यानंतर कुठलाही माणूस पडणारच. शरणकुमारही 'स्वाती'च्या बाबतीत पडले आहेत. म्हणून 'स्वाती' मधील 'राणीमाशी'चे रूप दाखवण्यासाठी या आत्मकथनाची निर्मिती शरणकुमार लिंबाळे यांनी केली आहे.'राणीमाशी' या आत्मकथनातील नायक हा विवाहित पुरूष आहे. त्याची कुसुम नावाची पत्नी आहे. या दांपत्याला अस्मिता, अमोल आणि अनघा नावाची तीन मूल आहेत. शरण हा शासकीय कर्मचारी आहे. तो ज्या ऑफिसमध्ये काम करतो त्याच ऑफिसमध्ये

'स्वाती' नावाची एक महिला कर्मचारीही काम करते. 'स्वाती' ही सवर्ण विवाहित सुंदर स्त्री आहे. तिचा नवरा दुसऱ्या कुठल्यातरी कंपनीत काम करतो. तो सनातनी वृत्तीचा आहे. कार्यालयीन कामकाजाच्या निमित्ताने स्वाती आणि शरणचा सारखा संबंध येतो. शरण हा कवी, लेखक असल्यामुळे त्याच्याकडे ऑफिसमध्ये बघण्याची दृष्टी वेगळी असते. स्वाती ही मनमोकळया स्वभावाची, बोलकी आणि मैत्रीपूर्ण जीवन जगणारी मध्यमवर्गीय स्त्री आहे. ऑफिसमध्ये दोघांची टेबले जवळजवळ असल्यामुळे त्यांच्यामध्ये जवळीक निर्माण होते. चहाला मिळून जाणे, जेवणाचे डबे सोबत खाणे, घरगुती गप्पा मारणे अशा प्रसंगांमधून दोघांच्या मनामध्ये एकमेकांच्याविषयी भावनिक नाते निर्माण होते. त्यातून दोघांची मैत्री. मैत्रीतून प्रेमसंबंधामध्ये रूपांतर होते. दोघेही एकमेकांवर प्रेम करू लागतात. शरणच्या हृदयात स्वाती रुजते आणि स्वातीच्या हृदयात शरण. दोघांनाही एकमेकाशिवाय करमेनासे होते. स्वातीचे सुंदर दिसणे शरणला भुरळ घालते तर शरणमधील लेखक स्वातीला आवडतो. एकमेकांच्या आवडण्यातून प्रेमाच सखोल बीज दोघामध्ये रूजते. एकमेकांना चिठ्ठ्या देणे, फोटो देणे, वाढदिवसानिमित्त रूमाल, डायरी, पुस्तक अशा भेटवस्तू देणे हे प्रकार सुरू होतात. शरण स्वातीच्या प्रेमात पूर्णपणे गुरफटून जातो. तो तिच्या प्रेमात वेडा होतो. लेखक असणारा शरणकुमार लिंबाळे फक्त स्वातीच्या रूपातील शब्दांना जन्म देऊ लागतो. लेखकाच्या लिहिण्याच्या प्रेरणा पूर्णपणे स्वातीमय होऊन जातात. स्वातीची अवस्थाही शरणमय होऊन जाते.

शरणस्वाती प्रेमाची चर्चा सगळीकडे चालू होते. ऑफिसमध्ये औदुंबरसाहेब, समीर जोशी, देवळे शिपाई, नरसाळे यांच्यामध्ये नेहमीच स्वाती शरणचा विषय रंगायचा. शरण रोज रात्री घरी उशिरा जातो. शरणच घराकडे पूर्णपणे दुर्लक्ष होऊन जाते. एकेकाळी चळवळीत सक्रियअसणारा, साहित्यावर मित्रांसोबत बोलणारा शरण ज्यावेळी लफडं, भानगडी, प्रेम यासारख्या विषयांत गुरफटला जातो हे सर्व शरणची पत्नी कुसुमच्या लक्षात येते. शरणही आपल्या पत्नीला मी 'स्वाती' मध्ये कसा व किती गुंतलोय हे सर्व स्पष्टपणे सांगून टाकतो. यातून शरणकुसुम या पतीपत्नीमध्ये मोठा संघर्ष निर्माण होतो. शरणस्वाती प्रकरण सर्वांच्याच चर्चेचा विषय होऊन बसते. प्रेमामध्ये कोणीच एकमेकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. स्वातीही शरणच्या

अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे दोघांच्यामध्ये मतभेद निर्माण होतात. खटके उडू लागतात. स्वातीच्या बिनधास्त वागण्यामुळे शरण संशयाने पछाडला जातो. स्वातीचं समीर जोशीबरोबरचे संबंध शरणला खटकतात. स्वातीच्या चारित्र्याचा संशय शरणला येतो. शरणच्याही वागण्याचा स्वातीला संशय येतो. शरणचे१९९

'स्मिता' बरोबरचे बोलणे चालणे स्वातीला खटकते. शरणच्याही चारित्र्याचा संशय स्वातीला येतो. हा संशय बळावत जातो. दोघामध्ये चकमकी घडतात. यातून दोघांमध्ये तणाव निर्माण होऊन 'स्वातीशरण' एकमेकांपासून दूर जातात. परंतु दूर गेल्यानंतर तणाव कमी होण्याऐवजी वाढतो. परस्परावर कुरघोडी करणे वाढते. त्यातून एकमेकावर आरोपप्रत्यारोप केले जातात. वैयक्तिक स्वाती शरण यांच्या प्रेमाचे परिणाम मित्र व कुटुंबाला भोगावे लागतात. शरणचे वैवाहिक जीवन व कुटुंब उद्ध्वस्त होण्याकडे जात असते. स्वातीवर सूड उगविण्याची शरणची ईर्षा आणि शरणवर सूड उगवण्याची स्वातीची ईर्षा प्रचंड टोकाला जाते. एकमेकांचे उणेदुणे काढत 'राणीमाशी' या आत्मकथनाचा शेवट होतो.

**'राणीमाशी' आत्मकथनातील विवाहबाह्य स्त्रीपुरूष संबंध:**

'राणीमाशी' या आत्मकथनामध्ये विवाहित स्त्री, पुरूष एकमेकांच्या प्रेमात पडतात. म्हणजेच समाजाच्या नीतिनियमांना डावलून दोघांमध्ये विवाहबाह्य संबंध प्रस्थापित होतात. त्यामुळे विवाहबाह्य संबंधामागे कोणत्या प्रेरणा असतात ? असे संबंध निर्माण करण्यात दोघांनाही कोणत्या प्रकारचा फायदा होणार असतो ? समाजाला असे विवाहबाह्य संबंध मान्य आहेत का ? या प्रश्नांची उत्तरे 'राणीमाशी'च्या संदर्भात शोधणे हे एक आव्हान आहे.

शरण आणि स्वातीमध्ये जे प्रेमसंबंध जुळतात आणि त्यांच्यामध्ये होणारे एकमेकांविषयी आकर्षण या संदर्भात विचार केल्यानंतर, खरोखरच दोघांमध्ये शरीरसंबंधाची गरज म्हणून ते एकत्र येतात का हे महत्त्वाचे ठरते. शरणकुमार लिंबाळे विवाहबाह्य संबंधाची व्याख्या देताना म्हणतात, "विवाहित स्त्री पुरूषांच्या इतरांशी असलेल्या लैंगिक संबंधाला 'विवाहबाह्य संबंध' असं म्हटलं जात. " शरणकुमार लिंबाळे विवाहबाह्य संबंधात 'लैंगिक संबंध' हा महत्त्वाचा घटक मानतात. या

दृष्टीने विचार करताना ‘राणीमाशी’मध्ये असा प्रत्यक्ष ‘स्वातीशरण’ यांचा शारीरिक संबंध कुठेही आढळत नाही. मात्र लैंगिक संबंधाकडे झुकणारी विधाने ‘राणीमाशी’ आत्मकथनात आढळतात. उदा. ‘मी स्वातीच्या पाठीत बुक्की मारली.’ (पृ.१०)

“स्वातीचे पाय माझ्या ओठाइतके मुलायम आहेत. ते कधीतरी चावले पाहिजेत. ..तू स्त्री आहेस म्हणून तुझ्यामाझ्यात अनेक फुलं हैराण होतात.” (पृ.१८)

“स्वातीच्या गालावरं उगवलेली तारूण्यपिटीका तिलाही नकळत मी त्या तारूण्यपिटीकेचा जोरात चिमटा घेतो. चिमटा घेतला तेव्हा आमचं तारूण्य किती गोंधळल होतं.” (पृ.१८)”मी स्वातीजवळ पूर्ण अशरीरी असतो. तरीही तिला पकडतो. ती ‘नको’ म्हणते मी ‘का?’ म्हणतो. ती ‘नको’ म्हणते म्हणजे नको म्हणते प्रत्येक शरीराचा एक ठरलेला सनातन नकार असतो.” (पृ.२५)

“तू मात्र मैत्रिणीशिवाय माझ्यात आणखी काहीतरी शोधतोयस. त्यामुळे मी गोंधळले. शांत डोहात खडा पडावा तशी. ‘हे आणखी काहीतरी’ म्हणजे नेमकं काय असावं, याचा अंदाज यायचा नाही.” (पृ.४५)

ह्या विधानावरून शरण आणि स्वातीमध्ये प्रत्यक्ष शरीर संबंध असल्याचा पुरावा सापडत नाही. त्यामुळे त्यांचे असणारे ‘विवाहबाह्य संबंध’ हे शरीरसुखाच्या गरजेतून निर्माण झालेले आहेत असे म्हणता येणार नाही. मात्र दोघांच्यामध्ये एकमेकाविषयी असणाऱ्या ‘भिन्नलिंगी’ आकर्षणामुळे ते एकमेकाकडे ओढले जातात आणि मित्रत्वाच्या नात्यानेच ते एकमेकाविषयी संबंध ठेवतात हे जरी खरे वाटत असले तरी, मित्रत्वाची गरज दोघांना इतकी अस्वस्थतेकडे घेऊन जाते की, दोघांनाही एकमेकांपासून क्षणभर दूर व्हावसं वाटत नाही. विरह सहन होत नाही. आणि ती सहनशीलता जेव्हा संपते त्यावेळी एकमेकांच्या मनात आत्महत्येचा विचार येतो. दोघांमधील शुद्ध निर्भेळ मैत्री विरहामध्ये अस्वस्थ करणारी का ठरावी ? या संदर्भात डॉ सूर्यनारायण रणसुभे यांचे मत विचारात घेणे योग्य ठरेल. ते म्हणतात, “माणूस जे वेगवेगळे संबंध प्रस्थापित करीत असतो त्याच्या मुळात तीन गरजा, शारीरिक, भावनिक व बौद्धिक अत्यंत महत्त्वाच्या असतात.... मानवी संस्कृतीचा असा प्रयत्न

आहे की, माणसाच्या या तिन्ही गरजा 'कुटुंब' या व्यवस्थेअंतर्गत पूर्ण व्हाव्यात. त्या जर तेथे पूर्ण होत नसतील तर मग त्याला कुटुंबाबाहेर संबंध वाढवावे लागतात." डॉ. रणसुभे यांच्या विचारांचा 'राणीमाशी' संदर्भात विचार केल्यानंतर असे जाणवते की, कौटुंबिक अपूर्णतेतून असे संबंध निर्माण होतात.

'स्वाती'च्या बाबतीत विचार केला तर स्वातीच्या मानसिक भावनिक गरजा तिच्या कुटुंबामध्ये पूर्ण होत नाहीत. स्वातीचा नवरा कुठल्यातरी कंपनीमध्ये काम करतो. त्याचे आणि स्वातीचे नवरा बायकोचे संबंध असूनसुद्धा जुजबी संबंध आहेत. त्यात भावनेचा ओलावा स्वातीला सापडत नाही. अशा भावनिक ओलाव्यासाठी स्वाती शरणमध्ये हा ओलावा शोधते.

'शरण' जीवनात बेफिकीर होतो. त्यावेळी स्वाती त्याला कर्तव्याची व अस्तित्त्वाची जाणीव करून देते. स्वाती म्हणते, "आयुष्य वेगळ असतं. मैत्री वेगळी असते. तू करिअरकडे लक्ष दे. मोठा झाला पाहिजेस. तू उगीच वेड्यासारखा बडबडतोस. मी हे होणार, ते होणार, पण करत मात्र काहीच नाहीस." (पृ. २९) अशा वक्तव्यांन शरण सुखावतो व करिअर घडविण्यासाठी प्रयत्नही करतो. 'स्वाती' बरोबरचे संबंध शरणला सुखावणारेवाटतात. त्याला त्यापासून आनंद होतो. मात्र या संबंधाविषयी दिनेश कांबळे, समीर जोशी व कुसुम शारीरिक लैंगिक संबंध म्हणतात. त्यामुळे शरणला त्याचा मनःस्ताप होतो. म्हणून शरण म्हणतो, "माझ्या मैत्रीची चर्चा माझ्या शरीरापुरतीच मर्यादित झाली होती. माझ्या मनाचा कुणीच विचार करीत नाही. माझी मैत्री म्हणजे केवळ एक शारीरिक आकर्षण, असंच त्याचं समीकरण झालं होतं, पण हे किती चुकीचं आहे, हे मी कसं समजावून सांगणार." (पृ.४१) शरणच्या मनात स्वातीविषयी असणारी ओढ ही शारीरिक आकर्षणापेक्षा भावनिक होती हे इथे लक्षात येते. स्वातीच्या आयुष्यात शरण येण्याअगोदर स्वातीकडे कुणीच आपल्या भावनेने पाहिलेले नव्हते. घरात तिच्याकडे दुर्लक्ष व्हायचे. स्वाती म्हणते, "माझ्याकडे वेळ द्यायला घरातल्यांना वेळ आहेच कुठं ?" (पृ. ३९) असा भावनिक आधार स्वाती शरणमध्ये शोधते आणि एकमेकांच्या भावनिक, मानसिक भुकेपायी दोघे एकमेकांच्या जवळ येतात.

## संदर्भ:


1. शरणकुमार लिंबाळे: 'राणीमाशी', प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, जाने. १९९२, मलपृष्ठ.
2. विजयकुमार खंदारे: 'शरणकुमार लिंबाळे यांची आत्मकथने एक अभ्यास', पुणे, विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी सादर करण्यात आलेली प्रबंधिका, १९९६, पृ. ७४.
3. शरणकुमार लिंबाळे: 'दलित ब्राह्मण', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, तिसरी आवृत्ती, जून, २००७, दत्ता भगत यांनी लिहिलेली प्रस्तावना, पृ. ८.
4. शरणकुमार लिंबाळे: 'राणीमाशी', पृष्ठ संख्या नाही.
5. श्रीपाल सबनीस: 'समतोल समीक्षा', दिलीपराज प्रकाशन, पुणे, जानेवारी, १९९४, पृ. ६२.
6. शरणकुमार लिंबाळे: 'राणीमाशी', मनातलं, पृष्ठसंख्या नाही.
7. शरणकुमार लिंबाळे: 'विवाहबाह्य संबंध', नवीन दृष्टिकोन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १५ जून, २००७, पृ. ५.
8. शरणकुमार लिंबाळे: तत्रैव, पृ. १०५१०६.


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.